# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे

फोन.नं. ०२२-२९४५१००१

Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र ९७

दिनांक- १४/०४/२०२१

## बेकादेशीररित्या "कोविड-१९, ईमरजन्सी सर्विसेस, फुड सप्लाय" नावाचा बोर्ड लावुन मोटार कारने विदेशी दारुची विक्री करणाऱ्या इसमाविरुद्ध अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली कारवाई

दिनांक १३.०४.२०२१ रोजी १७.०० वा.चे सुमारास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक पथक, मिरा-भाईंदर परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना पो.हवा./१६३ रामचंद्र पाटील यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, गोडदेव नाका, भाईंदर पुर्व या परिसरात पांडुरंग प्रभु नावाचा इमस हा त्याची मोटार कार क्र. एम.एच.०४-जे.एम.८०२३ या कारचे पुढील काचेवर कोविड-१९, "ईमरजन्सी सर्विसेस, फुड सप्लाय टीम" नावाचा बोर्ड लावुन बेकायदेशीर रित्या विदेशी दारु विक्री करीत आहे.

वरीष्ठांचे मार्गदशनाप्रमाणे श्री. एस.एस.पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यांनी मिळालेल्या माहितीनुसार पोलीस पथकासह गोडदेव नाका, भाईंदर पुर्व येथील इन्टीग्रेटेड फुड डिस्ट्रीब्रुशन, चायनीज व्हेजीटेबल आणि मिल्क प्रोडक्टस कंपनी या दुकानासमोर छापा टाकला असता, पाडुरंग नारायण प्रभु, वय- ५५ वर्ष, व्यवसाय- व्यापार, रा. सी-३११, प्रियदर्शनी को.ऑ. हौ.सोसायटी, गोडदेव नाका, मर्सी चर्चच्या पाठीमागे, भाईन्दर पूर्व हा त्याची रेनॉल्ट क्वीड, गाडी क्र. एम.एच.०४-जे.एम.८०२३ या कारचे पुढील काचेवर कोविड-१९, ईमरजन्सी सर्विसेस, फुड सप्लाय टिम नावाचा बोर्ड लावुन विदेशी दारु विक्री करीत असताना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन अधिक चौकशी केली असता नमुद कारमध्ये ५,७४०/- रु किंमतीचा (१८० मिली च्या एकूण ४१ बाटल्या) बेकायदेशी रित्या कब्जात बाळगुन विक्री करीत असताना मिळुन आला.

नमूद आरोपीविरुद्ध नवघर पोलीस ठाणे येथे पो.शि./३६६० के एन शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसर नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ३४०/२०२१ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई), ३४ अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उपायुक्त डॉ.श्री.महेश पाटील(गुन्हे),मा.सहा.पोलीस आयुक्त,श्री.रामचंद्र देशमुख, (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, अ.मा.वा.प्रति.कक्ष, भाईंदर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर विभागाचे अंमलदार पो.हवा./२२६९ उमेश पाटील, पोहवा.१६३ रामचंद्र पाटील, पो.हवा./२२९८ निलंगे, पो.शि/३६६० शिंदे यांनी केली आहे.

Scanned with CamScanner